समाजकल्याण अधिकारी, मुंबई यांना अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी प्राधिकृत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक इबीसी २०१५/प्र.क्र.१४१/शिक्षण-१
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०००३२.
दिनांक – १० सप्टेंबर, २०१५

वाचा-

१) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्रमांक इबीसी १०९४/प्र.क्र.१०९/मावक-२, दिनांक १७ ऑगस्ट, १९९५

२) शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक इबीसी १०९४/प्र.क्र.१०९/मावक-२, दिनांक २३ मे, २००३

३) शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, विशेष सहाय्य विभाग क्रमांक इबीसी २००३/प्र.क्र.४१७/मावक-२, दिनांक ३१ मार्च, २००५

४) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक इबीसी २००३/प्र.क्र.४६६/मावक-२ दिनांक ९ फेब्रुवारी, २००७

५) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक इबीसी २००८/प्र.क्र.६२/मावक-२ दिनांक १७ मार्च, २००९

६) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक इबीसी २०११/प्र.क्र.९७/शिक्षण-१ दिनांक ३० डिसेंबर, २०११

**शासन निर्णय-** अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना राबविल्या जातात. सदर योजनांपैकी खालील योजना राज्यातील जिल्हा परिषदेमधील जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचे मार्फत राबविल्या जातात :-

१) माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करणे.

२) खाजगी विनाअनुदानित व कायम विना अनुदानित शाळांमध्ये इयत्ता ९ वी व १० वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील अनुसूचित जाती, विजाभज व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करणेबाबत.

३) इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती, विजाभज व विशेष मागास प्रवर्गातील मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती प्रदान करणे.

४) इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.

५) अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना.

मुंबई जिल्हा व मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद नसल्याने सदर योजना दोन्ही जिल्ह्यांकरिता समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई यांचेमार्फत राबविल्या जातात. तरी उपरोक्त योजनांच्या शासन निर्णयांमध्ये ज्या ज्या ठिकाणी "जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद" असा उल्लेख असेल तेथे मुंबई जिल्हा व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यांकरिता "समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई" असे समजण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१५०११०१६०३१०१२२२ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(प्र.प. ल्हयाय)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
२) मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
३) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
४) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) संचालक, वि.जा.भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र. संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ लातूर/ नागपूर
७) सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण
८) सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
९) समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई
१०) महालेखापाल (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १, मुंबई
११) महालेखापाल (लेखा परिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र २, नागपूर
१२) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे (पूर्व), मुंबई
१४) निवड नस्ती (शिक्षण-२)